**भिमलकसा लघु पाटबंधारे योजना ता. साकोली जि. भंडारा या योजनेस तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याबाबत.**

# विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर

**महामंडळ निर्णय क्रमांक:** ३०२ **विपाविम/कातां २/ (धा.क्र ४८/२०१८)/ खडकी लपायो /** द्वितीय **सुप्रमा / २०१९,**
दि. ११/०९/२०१९

**पहावे:-**
१. शासन निर्णय क्र. एमआयव्ही ४९७२/(४२८२)/एमआय मंत्रालय मुंबई दिनांक ०८.०५.१९७३
२. शासन निर्णय क्रमांक एमआयव्ही ४९७२/(२१३/८५)/लपा-२ मंत्रालय मुंबई दिनांक १८.०५.१९८६
३. शासन निर्णय क्रमांक लपायो/२३११/प्र.क्र.(५५६/२०११)/लपा-२ मंत्रालय मुंबई दिनांक ०५.०२.२०१५
४. शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१५/(३५/२०१५)/जसं(आ), दि. ०९.०९.२०१५.
५. राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती, नासिक यांचे पत्र. क्र. रातांसस(१)/ कक्ष-१(मु)/भिमलकसा लपा /(धा.क्र.०८/२०१९) /३४४/२०१९, दि. २०.०३.२०१९.
६. अतिरीक्त मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, यांचे अध्यक्षतेखाली दि.२०.७.२०१९ रोजी झालेल्या सचिव स्तरावरील उपसमितीच्या बैठकीचे इतिवृत्त क्र. बैठक-२०१९/(१८३/२०१९)/लपा, दि. २७.८.२०१९
७. विपाविम नियामक मंडळाचे दि. २४.०७.२०१९ रोजी संपन्न ७५ व्या बैठकीतील ठराव क्र. ७५/२०

**प्रस्तावना :**

भिमलकसा लघु पाटबंधारे योजना, हा प्रकल्प या महामंडळांतर्गत गोदावरी खो-यातील वैनगंगा उपखो-यात भंडारा जिल्ह्यातील साकोली तालुक्यातील वडेगांव गावाजवळ आहे. हा प्रकल्प माजी मालगुजारी तलाव असुन अस्तित्वातील तलावातुन सिंचन प्रस्तावित आहे. याप्रकल्पाव्दारे भंडारा जिल्ह्यातील साकोली तालुक्यातील पाच गावातील ९३१ हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळणार आहे.

भिमलकसा लघु पाटबंधारे योजना, ता. साकोली जि. भंडारा या योजनेस शासन निर्णय क्र. एमआयव्ही ४९७२/(४२८२)/एमआय मंत्रालय मुंबई दिनांक ०८.०५.१९७३ अन्वये अंदाजित खर्च रु. ०.२५ कोटी (दरसूची १९७२-७३ वर आधारित) मुळ प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली होती. तदनंतर शासन निर्णय क्रमांक एमआयव्ही ४९७२/(२१३/८५)/लपा-२ मंत्रालय मुंबई दिनांक १८.०५.१९८६ अन्वये रु. ०.९३ कोटी (दरसुची १९८४-८५ वर आधारित) प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली होती. तदनंतर शासन निर्णय क्रमांक लपायो/२३११/प्र.क्र.(५५६/२०११)/लपा-२ मंत्रालय मुंबई दिनांक ०५.०२.२०१५ अन्वये रु. २८.७४ कोटी (दरसूची २०११-१२ वर आधारित) द्वितीय सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली.

बांधकामाचे दरम्यान योजनेच्या खर्चात दरसुचीतील बदलामुळे झालेली वाढ, भूसंपादन खर्चातील वाढ, इतर कारणे व अनुषंगीक खर्च इत्यादी कारणांमुळे वाढ झाली असून योजनेची अद्यावत किंमत मुळ प्रशासकीय मान्यता किंमतीच्या दहा टक्क्याहून अधिक वाढत असल्याने द्वितीय सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करणे आवश्यक झाले आहे .

भिमलकसा लघु पाटबंधारे योजनेचा तृतीय सुप्रमा बाबत महामंडळस्तरावर तयार केलेल्या छाननी अहवालाचा मुल्यार्पण अहवाल राज्यस्तरीय तांत्रीक सल्लागार समिती (१), नाशिक, यांचे दि. १७ व १८.०३.२०१९ रोजीच्या १२५ व्या बैठकीत अंतिम करण्यात आला असून पुढील कार्यवाहीस्तव संदर्भिय पत्र क्र. ४ नुसार प्राप्त झालेला आहे.

भिमलकसा लघु पाटबंधारे योजनेच्या तृतीय सुप्रमा प्रस्तावावर दि.२०.७.२०१९ रोजी झालेल्या मा. सचिव उपसमितीचे बैठकीत चर्चा होवून प्रस्ताव नियामक मंडळासमोर पुढील निर्णयार्थ सादर करण्यास सहमती दर्शविण्यात आली आहे.

संदर्भ क्र. ४ च्या शासन निर्णयानुसार विदर्भातील प्रकल्पांना सु.प्र.मा. देण्याचे अधिकार महामंडळास प्रदान करण्यात आलेले आहेत.

दि. २४.७.२०१९ रोजी झालेल्या नियामक मंडळाचे ७५ व्या बैठकीतील ठराव क्र. ७५/२० नुसार भिमलकसा लघु पाटबंधारे योजनेच्या रू. ४१.१६ कोटी अंदाजित किंमतीच्या तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्तावास मा. सचिव उपसमितीने उपस्थित केलेल्या मुद्यांचे अनुपालनाचे अधीन राहून मान्यता दिली असून या बाबतचे आदेश कार्यकारी संचालक यांनी निर्गमित करण्याकरिता नियामक मंडळाने मान्यता प्रदान केलेली आहे.

सदर प्रकल्पाची द्वितीय प्रशासकीय मान्यता किंमत रू. २८.७४ कोटी च्या तुलनेत तृतीय सुप्रमा प्रस्तावानुसार प्रकल्पाची किंमत रू. १२.४४ कोटी जास्त आहे. किंमत वाढीची प्रमुख कारणे पुढीलप्रमाणे आहेत:-

| अ.क्र. | बाब | वाढ रू कोटी | मंजुर प्रथम सुप्रमा किंमतीच्या तुलनेत वाढीची टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | दरसुचीतील बदलामुळे वाढ | १.१५ | ४.०० % |
| २ | भूसंपादनाच्या किंमतीतील वाढ | ६.५८ | २२.८९ % |
| ३ | संकल्पचित्रातील बदलामुळे झालेली वाढ | १.३७ | ४.७७ % |
| ४ | इतर कारणांमुळे झालेली वाढ | १.२४ | ४.३१ % |
| ५ | अनुषंगीक खर्च बचत | २.१० | ७.३० % |
| | एकुण | **१२.४४** | **४३.२८ %** |

**विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाचा निर्णय :**

विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ आता या निर्णयान्वये भंडारा जिल्ह्यातील भिमलकसा लघु पाटबंधारे योजना, ता. साकोली जि. भंडारा या योजनेच्या एकूण अंदाजित खर्च रू. ४१.१६ कोटी (रू. एक्केचाळीस कोटी सोळा लक्ष फक्त) किंमतीस तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करीत आहे. त्यापैकी रू. ३७.७४ कोटी (रू. सदतीस कोटी चो-यात्तर लक्ष फक्त) कामाप्रित्यर्थ व रू. ३.४२ कोटी (रू. तिन कोटी बेचाळीस लक्ष फक्त) अनुषंगिक खर्च आहे. अंदाजपत्रकात उर्वरीत कामांसाठी जलसंपदा विभागाची सन २०१७-१८ या वर्षाच्या दरसूचीप्रमाणे दर वापरण्यात आले आहेत. उपशिर्षवार तरतुदींचा गोषवारा परिशिष्ट-१ मध्ये संलग्न आहे.

१. ठळक बाबी –

| | |
|---|---|
| **अ) योजनेचे सिंचन क्षेत्र** | **- ९३१ हेक्टर** |
| **ब) योजनेमुळे एकुण होणारा पाणीसाठा** | **- ३.६०९ द.ल.घ.मी. (३६०९.०० स.घ.मी.)** |
| **क) प्रति स.घ.मी. पाणीसाठा किंमत** | **-रू.१,१४,०४८/-(मापदंड रू.१,२२,१३२ /- प्रती स.घ.मी.)** |
| **ड) योजनेचे लाभव्यय गुणोत्तर** | **- १.०६ (मापदंड १.०० पेक्षा जास्त)** |

२. या योजनेच्या कामावरील खर्च मागणी क्र.आय -५, मुख्य लेखाशिर्ष "४७०२", लघु पाटबंधारे यावरील भांडवली खर्च, (८०)- सर्वसाधारण, (१९०)-सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमातील गुंतवणुका (००) (०५), विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ भाग भांडवली अंशदान (४७०२ ५१०-१) या लेखाशीर्षाखाली खर्ची घालावा व विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाकडील मंजुर अनुदानातून भागविण्यात यावा.

३. या योजनेस प्रदान केलेली तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यता (२९ /२०१९) या अनुक्रमांकावर नोंदविण्यात आली आहे.

४. सदर तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यता खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

४.१) सदर सुधारित प्रशासकीय मान्यता म्हणजे प्रकल्प कार्यान्वयीन करण्याच्या विविध टप्प्यावर झालेल्या अनियमिततेस मान्यता गृहीत धरता येणार नाही.

४.२) या प्रकल्पाबाबत चालू असलेल्या अथवा प्रस्तावित विभागीय चौकशी कार्यवाही पूढे चालू ठेवावी. तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याच्या निर्णयामुळे विभागीय चौकशीच्या कार्यवाहीस कोणतीही बाधा पोहचणार नाही.

४.३) आर्थिक दायित्व निर्माण होईल अशा नवीन घटकांचा शासन मान्यतेशिवाय समावेश करण्यात येऊ नये.

४.४) प्रगतीपथावरील निविदांची कामे प्राधान्याने पूर्ण करण्यात यावीत. पाणीसाठ्याचा सिंचनाकरीता जास्तीतजास्त लाभ होईल अशा प्रकारे उर्वरित कामांचा प्राधान्यक्रम निश्चित करण्यात यावा व त्यानुसार कामे/निविदा प्रक्रिया करण्यात यावी.

४.५) सदर प्रकल्पासाठी कोणत्याही प्रयोजनार्थ मंजूर तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या मर्यादेबाहेर जाऊन निधी वितरण अथवा अतिरीक्त खर्च करता येणार नाही. या संदर्भात प्रचलित शासन निर्णय, CWC ची मार्गदर्शक तत्वे. वित्त अधिकार मर्यादा, विहित केलेली निविदा कार्यपध्दती यांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

४.६) राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीच्या अहवालात नमुद मुद्दा क्र. २६ व २७ चे अनुपालन करण्यात यावे.

४.७) मा. सचिव उपसमितीने उपस्थित केलेल्या मुद्यांचे अनुपालन करण्यात यावे.

४.८) प्रकल्पाचे काम नियोजना नुसार पूर्ण करण्यात यावे.

५. सदर महामंडळ निर्णयाची अंमलबजावणी निर्गमित दिनांकापासून करण्यात यावी.

६. सदर निर्णय जलसंपदा विभागाचे wrd.maharashtra.gov.in या संकेतस्थळा वरील विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाचे Mini Web Portal वर उपलब्ध करण्यात आला आहे.

"मुळ प्रत मा. कार्यकारी संचालक यांना मान्य"

अधीक्षक अभियंता
विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ,
नागपूर

**प्रत सहपत्रासह,**

१. स्वीय सहाय्यक, मा. मंत्री, जलसंपदा, मंत्रालय, मुंबई.-३२
२. प्रधान सचिव (जसं प्र व वि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई -३२
३. सचिव (जसंव्य व लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई -३२
४. महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा व अनुज्ञेयता), नागपूर.
५. महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा परिक्षा), नागपूर.
६. वित्त विभाग, (व्यय-१२) मंत्रालय, मुंबई -३२
७. नियोजन विभाग, (कार्यासन १४३४), मंत्रालय, मुंबई -३२
८. आयुक्त, नागपूर प्रदेश, नागपूर.
९. मुख्य अभियंता, गोसिखुर्द प्रकल्प, जलसंपदा विभाग, नागपूर.
१०. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, महामंडळ कार्यालय, नागपूर.
११. जिल्हाधिकारी, भंडारा.
१२. अधीक्षक अभियंता, नागपूर पाटबंधारे मंडळ, नागपूर.
१३. कार्यकारी अभियंता, मध्यम प्रकल्प विभाग, गोंदिया.
१४. विभागीय संपर्क अधिकारी, माहिती व जनसंपर्क संचालनालय, नागपूर
१५. कातां ७(१), संग्रहार्थ.
१६. चित्र शाखा, संग्रहार्थ.

भिमलकसा लघु पाटबंधारे योजना ता. साकोली जि. भंडारा या योजनेस तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याबाबत.

महामंडळ निर्णय क्रमांक: विपाविम/कातां २/३०२(धा.क्र ४८/२०१८)/ खडकी लपायो / द्वितीय सुप्रमा / २०१९, दि. १९/०९/२०१९

परिशिष्ट - १

भिमलकसा लघु पाटबंधारे योजना, ता. साकोली, जि. भंडारा

रु. कोटी

| अ.क्र. | उपशिर्ष | रक्कम | | एकूण रुपये |
|---|---|---|---|---|
| | | शिर्ष कामे | मुख्य कालवा | |
| १. | "ऐ" प्राथमिक कामे | ०.०० | ०.०० | ०.० |
| २. | "बी" जमिन (II & III) कालवे | १९.६८ | १.१६ | २०.८४ |
| ३. | "सी" मुख्य कामे | ७.५५ | ०.०० | ७.५५ |
| ४. | "डी" विमोचक | ०.०५ | ०.४६ | ०.५१ |
| ५. | "ई" प्रपात | ०.०० | ०.२३ | ०.२३ |
| ६. | "एफ" नाल्यावरील कामे | ०.०० | १.२८ | १.२८ |
| ७. | "जी" पुल | ०.०० | ०.१९ | ०.१९ |
| ८. | "एच" अतिवाहक | ०.०० | ०.०० | ०.० |
| ९. | "के" इमारत | ०.०१ | ०.०० | ०.०१ |
| १०. | "एल" मातीकाम | ०.०० | २.०९ | २.०९ |
| ११. | "एम" वृक्षारोपण | ०.०७ | ०.०२ | ०.०९ |
| १२. | "ओ" संकीर्ण | ०.१५ | ०.०४ | ०.१९ |
| १३. | "पी" देखभाल | ०.०७ | ०.०२ | ०.०९ |
| १४. | "क्यु" हत्यारे व सयंत्रे | ०.०० | ०.०० | ०.०० |
| १५. | "आर" दळणवळण | ०.१५ | ०.०० | ०.१५ |
| १६. | बंद नलिका वितरण प्रणाली | ०.०० | ४.५२ | ४.५२ |
| | एकूण कामाप्रित्यर्थ किंमत | | | ३७.७४ |
| | अनुषंगिक खर्च | | | ३.४२ |
| | योजनेची एकूण किंमत | २७.७३ | १०.०१ | ४१.१६ |

"मुळ प्रत मा. कार्यकारी संचालक यांना मान्य"

अधीक्षक अभियंता
विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ,
नागपूर १८.९.२०१९